Kvisoft PDF Merger DEMO : Purchase from www.kvisoft.com to remove the watermark


# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ ( १९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail :gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/९५३३ दिनांक २५/१०/२०२१

अत्यंत तातडीचे/कालमर्यादेत

## परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– महाविद्यालयीन/विद्यापीठीय विद्यार्थ्यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत

संदर्भ :– १.महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्रमांक युएनआय (८२/२१) विशि–१ दिनांक २१/१०/२०२१

२.महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:संकिर्ण २०२१/प्र.क्र.६/विशी– दिनांक १३ /१०/२०२१

महोदय

उपरोक्त संदर्भांकित विषयांन्वय कळविण्यात येते कि, कोवीड –१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती. परंतु संदर्भिय क्र २ चे शासन निर्णयानुसार राज्यातील कोवीड–१९ बाधित रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात कमी झालेली असल्यामुळे दिनांक २०/१०/२०२१ पासुन संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग सुरु करण्यास शासनाकडुन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग सुरु झाल्याने विषयांकित प्रकरणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या लसीकरणाबाबतचा माहिती सोबत दिलेल्या लिंकवर **Google Form** मध्ये भरुन दिनांक २८/१०/२०२१ पर्यंत न चुकता विद्यापीठाकडे पाठवावी व त्याचा अहवाल तातडीने विद्यापीठात सादर करावा, जेणेकरुन सदर माहीती विहीत मुदतीत शासनास पाठविने सोईचे होईल. सदर लिंक विद्यापीठाचे संकेतस्थळावर **Flash** वर तसेच **College Section Folder** मध्ये **Principal Link** मध्ये उपलब्ध आहे.

**Google Form Link:**
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSe8YKbAUR6fSlSAjSWlccM-lydZhy0AeSBC_aHoeNiVowVyFg/viewform

स्वा/–
(डॉ. ए. झेड चिताडे )
कुलसचिव (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
5- मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 1272 दिनांक 25/10/21
जावक क्र. ........ दिनांक ........

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ........
जावक क्र. 1518 दि. 25/10/21

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
मध्यवर्ती इमारत, पुणे स्टेशन, पुणे - ४११ ००१
Phone No. ०२०-२६१२२१११ Web : www.dhepune.gov.in Email : director.dhepune@nic.in

जा.क्र. युएनआय(८२/२१)/विशि-१/ 12361 दिनांक : २१.१०.२०२१

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
२. कुलसचिव, सर्व अकृषि / अभिमत/ स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

**विषय : महाविद्यालयीन / विद्यापीठीय विद्यार्थ्यांचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत**

संदर्भ : मा. आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे समवेत दिनांक २१.१०.२०२१ रोजी दूरदृश्यप्रणालीद्वारे आयोजित बैठक

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय बैठकीत झालेल्या चर्चेनूसार कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक १३.१०.२०२१ अन्वये राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दिनांक २०.१०.२०२१ पासुन सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु झाल्याने विषयांकित प्रकरणी महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत दिनांक २१.१०.२०२१ रोजी आरोग्य विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांसह संयुक्त बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांच्या लसीकरणाबाबत अभियान स्वरुपात कामकाज करण्याचे निर्देश देण्यात आले.

यासाठी आपल्या विभागातील अधिनस्त सर्व विद्यापीठीय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लसीकरणाबाबतचा तपशिल खालील विवरणपत्रात संबंधित आरोग्य विभागास देण्यात यावा.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ष (प्रथम/ द्वितीय/ तृतीय) | वय | मोबाईल क्रमांक | प्रथम डोस दिनांक | लसीचे नाव | द्वितीय डोस दिनांक | लसीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

सर्व विद्यापीठांनी प्रस्तुतची माहिती प्राप्त करण्यासाठी त्यांचे स्तरावर Google Form तयार करुन या फॉर्म मध्ये उपरोक्त माहिती तसेच आपले स्तरावर अधिकचा तपशिल आवश्यक असल्यास त्याचा अंतर्भाव करुन सदरची माहिती संकलित करावी. विद्यापीठ स्तरावर या अभियानासाठी स्वतंत्र लसीकरण विशेष कक्ष स्थापन करुन या कक्षाने सदरची माहिती संबंधित आरोग्य विभागास दिनांक २२.१०.२०२१ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

AR (College Section)
25/10

विभागीय सहसंचालक यांनी या अभियानासाठी संबंधित विद्यापीठाशी समन्वय साधून प्रस्तुतचा तपशिल कालमर्यादेत प्राप्त होईल व सदरचे अभियान यशस्वी होईल यासाठी उचित कार्यवाही करावी, केलेल्या कार्यवाहीचा तपशिल संचालनालयास सादर करण्यात यावा.

**(डॉ. धनराज माने)**
संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. खाजगी सचिव, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
३. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२